सकाळ दि. 17.07.2023

सकाळ 17.07.2023

# जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना मुद्देमालासह करण्यात आले अटक

## वजिराबाद पोलिसांची १४ तासांच्या आत कारवाई

**नांदेड, ता. १६** : रस्त्याने जाणाऱ्या-येणाऱ्यांना अडवून जबरी चोरी करण्याचे प्रकार अलिकडे वाढले आहेत. त्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी यावर आळा घालण्यासाठी सर्व पोलिस ठाण्यांना सतर्क केले आहे. त्यानुषंगाने वजीराबाद पोलिसांनी २४ तासाच्या आत जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना मुद्देमालासह अटक केली आहे.

अधिक माहिती अशी की, मोहम्मद फैज मोहम्मद सईद (रा. इतवारा) हे त्यांचा मित्र शेख अरबाज यांच्या सोबत देगलूर नाक्याकडे १३ जुलै रोजी जात हते. यावेळी दुचाकीवर आलेल्या दोन व्यक्तींनी त्यांना खंजरचा धाक दाखवून जबरी चोरी केली होती. त्याचा गुन्हा वजीराबाद पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला होता. त्यावरून आरोपींचा शोध सुरु असताना खुनाच्या गुन्ह्यातून जामीनावर सुटलेला आरोपी जयमलसिंघ उर्फ गग्गू हरबंससिंघ धालीवाल (वय २०, रा. अबचलनगर नांदेड) हा पंजाब राज्यातून आला असून, त्यांनीच साथीदाराच्या मदतीने हा गुन्हा केला असून तो पंजाबला पळून जाण्याच्या तयारीत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून त्याचा शोध घेतला असता तो नगीनाघाट येथे असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्याचा पाठलाग करून जयमलसिंघसह आकाशसिंघ साहेबसिंघ सुखमनी (वय २२, रा. बडपूरा नांदेड) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दुचाकीसह जबरीने चोरी केलेले रोख दोन हजार रुपये जप्त केले आहे. त्यांना सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय मंठाळे यांनी न्यायालयात हजर केले असता, त्यांना १९ जुलैपर्यंत कोठडी मिळाली आहे. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक शिवराज जमदडे, चंद्रकांत पवार, पोलिस उपनिरीक्षक दशरथ आडे, पोलिस अमलदार शरदचंद्र चावरे, विजयकुमार नंदे, मनोज परदेशी, रमेश सूर्यवंशी, शेख ईम्रान, साहेबराव कदम, राजु बोधगिरे यांनी केली आहे.

देशोन्नती दि. 17.07.2023

# जबरी चोरीतील आरोपी मुद्देमालासह २४ तासाच्या आत अटकेत

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ देगलूर नाक्याकडे जात असलेली दुचाकी अडवून दुचाकीस्वारास लुटणाऱ्या चोरट्याचा वजीराबाद पोलिसांनी २४ तासात छडा लावून त्यांच्याकडून नगदी रक्कमेसह ८२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

**वजीराबाद पोलीसांची कामगिरी, ८२ हजाराचा मुद्देमाल जप्त**

इतवारा भागातील रहिवासी मोहमद फैज मोहमद सईद रा. इतवारा हे त्यांचा मित्र शेख अरबाज यांचेसोबत १३ जुलै रोजी सायंकाळी देगलुर नाक्याकडे जात असतांना त्याचे पाठीमागून एका मोटरसायकलवर डोक्याला पगडी बांधून आलेल्या दोन चोरट्यानी मोटरसायकल अडवून त्यांना खंजरचा धाक दाखवून दुचाकीस्वाराच्या खिशातील पैशाचे पॅकेट बळजबरीने काढुन त्यातील २००० रुपये चोरुन घेऊन गेल्याबाबतची तक्रार दिल्यावरुन वजीराबाद पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरुन पोनि अशोक घोरबांड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवराज जमदाडे, सपोनि चंद्रकांत पवार, पोउपनि दशरथ आडे, पोलीस अंमलदार शरदचंद्र चावरे, विजयकुमार नंदे, मनोज परदेशी, रमेश सुर्यवंशी, शेख ईम्रान, साहेबरावं कंदम, राजु बोधगिरे यांनी घडलेल्या घटनेच्या ठिकाणी जाऊन तेथील परिस्थीतीची पाहणी करुन जवळपासचे सर्व सिसिटीव्ही फुटेज चेक करुन आरोपीतांचा शोध घेण्यासाठी सतत परीश्रम घेतले. सदर चोरटयांबाबत गोपनीयरित्या माहीती हस्तगत करण्याचा प्रयत्न केला असता खुनाचे गुन्हयातून जामीनावर सुटलेला गुन्हेगार जयमलसिंघ उर्फ गग्गा धालीवाल हा पंजाब राज्यातून आला असुन त्यानेच त्याचे साथीदाराचे मदतीने सदरचा गुन्हा केला असुन तो पंजाब राज्यामध्ये पळुन जाण्याचे तयारीत असल्याची माहीती मिळाली. त्यावरुन सदर जयमलसिंघ उर्फ गग्गा धारीवाल याचा शोध घेता तो व त्याचा सोबती नगीनाघाट मार्गाने दुचाकीवर जातांना दिसून आले. यावेळी पोलिसांनी त्याचा पाठलाग करुन जयमलसिंघ उफ गग्गा धारीवाले, (२३) रा. अबचलनगर , आकाशसिंघ सुखमनी (२२) रा. बडपूरा या दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हाची कबुली दिली. सदर चोरट्याकडून गुन्हयात वापरलेली त्यांच्या ताब्यातील मोटरसायकल व जबरी चोरी केलेले नगदी २ हजार रुपये असा एकुण ८२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा २४ तासाचे आत उघडकीस आणुन सदर आरोपीस आज सपोनि दत्तात्रय मंठाळे यांनी न्यायालयात आरोपीना हजर केले असता न्यायालयाने त्यांना १९ जुलै पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.